म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क्र. २९२

# त्रिभुवनेश्वर लिंगराज

## भुवनेश्वर



REFBK-0012198

भारत दर्शन

# सांस्कृतिक भारत दर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि० ............
क्रमांक ............ नों० दि० ............
REFBK-0012198
क्र. नि. १२१९८

आनंदयात्री

# त्रिभुवनेश्वर लिंगराज

## श्रीक्षेत्र भुवनेश्वर

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड
३ राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २

श्री : ३१८ [ ६–६१ ]

© १९६१
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई.

आवृत्ति पहिली : १९६१

किंमत ८० नये पैसे

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २.



मुद्रक :
ज. श्री. टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८, नारायण पेठ,
पुणें २.

# त्रिभुवनेश्वर लिंगराज

## ( श्रीक्षेत्र भुवनेश्वर )

**इतिहासप्रसिद्ध कलिंग-भूमि :**

ओरिसा प्रदेश प्राचीन काळीं कलिंग, उत्कल, ओड्र या नांवांनी ओळखला जात असे. दोन-अडीच हजार वर्षांपासून कलिंगाच्या वैभवाची आणि सामर्थ्याची ख्याति इतिहासांत गाजत आहे. मौर्यांच्या काळांत मगध साम्राज्याशीं दोन हात खेळण्याचें धैर्य या कलिंगभूमीनें दाखविलें होतें. चंद्रगुप्त मौर्याच्या भारत-विजयी कारकीर्दीतहि कलिंग अजिंक्यच होता. पुढें चंद्रगुप्ताचा नातू अशोक यानें कलिंग-विजयाचा चंग बांधला. अशोकाशीं झुंज घेतांना कलिंगभूमीच्या सहस्रावधि सुपुत्रांनीं हातावर प्राण घेतले आणि अशोकाला प्रतिकार करतांना हौतात्म्य पत्करलें. प्रत्यक्ष अशोकानेंच आपल्या तेराव्या शिलाशासनांत या भयंकर युद्धाचें वृत्त नोंदवितांना म्हटलें आहे : “ कलिंग-युद्धांत एक लाख सैनिक रणभूमीवर पडले. दीड लाख सैनिकांना पकडून गुलाम करण्यांत आलें आणि लाखों लोक युद्धजन्य परिस्थितीमुळें मृत्युमुखीं पडले ! ” याचा अर्थच असा कीं, त्या काळांत कलिंगभूमीचे सुपुत्र शौर्य आणि धैर्य या गुणांचे पुतळे होते. कलिंग-युद्धांतील भीषण संहाराच्या दर्शनानें अशोकाचें हृदय वितळलें — ‘चंडाशोका’चें ( कठोरहृदय अशोकाचें ) ‘धर्माशोकां’त ( धर्मशील दयाळू अशोकांत ) रूपांतर झालें. अशोकाच्या प्रेरणेनें आणि पुरस्कारानें कलिंगावर बौद्ध धर्माची पिवळी छाया पसरली. परंतु या परिवर्तनानें कलिंगाचें हृदय शांत झालें नाहीं. पराभवाचें आणि अपमानाचें शल्य त्याच्या हृदयांत सतत सलत होतें. मगधाच्या आक्रमण-

शील वृत्तीचा त्याला संताप आला होता. या सात्त्विक संतापाचा उद्रेक कलिंग-सम्राट् खारवेलाच्या रूपानें उसळला आणि त्यानें पराभवाचें सलतें शल्य उपटून टाकलें. खारवेल हा जैन धर्माचा अनुयायी आणि मगध-सम्राट् बौद्ध धर्माचे अनुयायी. दोघेहि अहिंसक. परंतु राजकीय संघर्षांत या धर्मनिष्ठेचें स्थान गौणच राहतें. खारवेलानें मगधावर दोनदां हल्ला चढविला. पहिल्या हल्ल्याच्या वार्तेनें मगधाचा ग्रीक सम्राट् डेमेट्रियस हा मथुरेला पळून गेला. दुसऱ्या हल्ल्याच्या वेळीं खारवेलानें पाटली-पुत्राच्या सुसुंग राजवाड्यांत आपले हत्ती बांधले आणि पूर्वी मगध-सम्राटानें पळवून नेलेली जिनमूर्ति परत आणली. खारवेलाच्या सामर्थ्याचा दरारा उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेंत तेलंगणापर्यंत गाजत होता. या सर्व रोमहर्षक ऐतिहासिक स्मृति भुवनेश्वरच्या परिसरांत आजाहि जाग्या आहेत. भुवनेश्वरजवळ धौली येथें अशोकाच्या कलिंग-विजयाची आणि कलिंग-शासनाची स्मृतिगाथा गाणारे अवशेष आहेत, तर खंडागिरि-उदयगिरि या टेकड्यांवर खारवेलाच्या पराक्रमाच्या खुणा आहेत. तेथील खारवेलाच्य ाथीगुंफा-शिलालेखांत त्याच्या मगध-विजयाचा गौरव कोरलेला आहे.

**नवकालिंगाची राजधानी :**

भुवनेश्वर हें पूर्वभारतांतील एक प्रख्यात तीर्थक्षेत्र आहे. हें स्थान ओरिसा राज्यांत पुरी जिल्ह्यांतील खुर्दा विभागांत आहे. कटक-पुरी लोह-मार्गावर कटकपासून अवघ्या अठरा मैलांवर भुवनेश्वर आहे. या नगराच्या प्राचीन वैभवाला आतां नवा उजळा मिळत आहे. ओरिसाची राजधानी कटकहून हालवून, ती भुवनेश्वर येथें थाटली जाणार आहे आणि त्यासाठीं भुवनेश्वरचा राजधानीला साजेसा कायकल्प होत आहे· १३ एप्रिल १९४८ या दिवशीं नव्या राजधानीच्या बांधणीची कोन-शिला महामंत्र्यांच्या हस्तें बसविण्यांत आली आणि आतांपर्यंत पांच कोटि रुपये खर्चून निम्म्याहून अधिक काम पार पाडलें गेलें आहे.

शाळा, क्रीडांगणें, व्यापार-पेठा, उद्यानें, शासकीय कार्यालयें आणि लहानमोठीं निवास-गृहें या सर्वांची नवी आंखीव घडण पूर्णांशानें पार पडल्यावर भुवनेश्वरचें पूर्ववैभव आनंदानें हंसेल आणि उत्कलभूमीच्या नव्या घडणींत आपलाहि कांहीं वारसा आहे, या साभिमान जाणिवेनें या नगरीचा आत्मा सुखावेल.

**मंदिरनगरी भुवनेश्वर :**

भुवनेश्वर ही मंदिरांची नगरी आहे. यांत इतकीं लहान-मोठीं मंदिरें आहेत कीं, त्यांच्या गणनेचाहि कोणीं प्रयत्न करायला धजत नाहीं. एका जिज्ञासूनें या मंदिरांची गणना करण्याचा प्रयत्न केला असून, त्याच्या मतें येथील मंदिरांची संख्या सुमारें पांचशें आहे. हीं मंदिरेंहि जवळ जवळ नसून खूप दूरपर्यंत पसरलेलीं आहेत.



मुक्तेश्वर-मंदिराचें तोरण

लिंगराज-मंदिर आणि त्याच्या प्राकारांतील अनेक छोटीं-मोठीं मंदिरें, अनंत-वासुदेव-मंदिर, परशुरामेश्वर-मंदिर, मुक्तेश्वर-मंदिर, रामेश्वर मंदिर, ब्रह्मेश्वर-मंदिर, मेघेश्वर-मंदिर, राजाराणी-मंदिर, केदार-गौरी-मंदिर, सिद्धेश्वर-मंदिर, इत्यादि असंख्य मंदिरांनीं भुवनेश्वर भरलें आहे. या सर्वच मंदिरांची रचना एकाच पद्धतीची

असली, तरी त्यांच्यांतील कला-वैशिष्ट्यें विविध आहेत. या मंदिरांची विपुलता आणि त्यांच्या बांधणींतील सौंदर्याची आकर्षक विविधता यांमुळें प्रेक्षक मंत्रमुग्ध होऊन जातो. किती पाहूं नि काय पाहूं, असा त्याला संभ्रम निर्माण होतो.

**एकाम्र काननांत लिंगराज :**

पुराणांत हें स्थान एकाम्र कानन, एकाम्र क्षेत्र, हेमाचल, स्वर्णाद्रि, स्वर्णगिरि इत्यादि नांवांनीं उल्लेखिलेलें आहे. या स्थानासंबधींची पुराण-कथा पुढीलप्रमाणें आहे :

एकदां अनेक ऋषि एकत्र मिळून भगवान् व्यासांकडे गेले आणि त्यांनीं श्रीव्यासांना विनंती केली कीं, " भगवन्, आम्हांला एकाम्र-क्षेत्राचा महिमा विशद करून सांगावा. " ऋषींच्या या विनंतीवरून श्रीव्यासांनीं निवेदिलेला या क्षेत्राचा महिमा असा आहे :

एकदां श्रीक्षेत्र काशी येथें पार्वती शिवाला म्हणाली कीं, " प्रभु, आपणांस काशीहून प्रिय असें एखादें स्थान या जगतीतलावर आहे काय ? " त्यावर शिवानें उत्तर दिलें, " उमे, तुझ्यापासून कांहींहि लपवून ठेवण्याची माझी इच्छा नाहीं. ऐक. दक्षिण सागराच्या पूर्व-किनाऱ्यावर उत्कल नांवाचा एक देश आहे. त्या देशांत गंगेइतकीच पवित्र असलेली गंधवती नांवाची नदी वाहत आहे. त्या नदींत सदैव सुवर्ण-कमळें फुललेलीं असतात आणि राजहंस विहार करतात. या गंधवतीच्या कांठीं एकाम्र कानन नांवाचें वन आहे. तें वन माझें परमप्रिय विहार-स्थान आहे. तें कैलासाहूनहि सुंदर आहे. त्या वनांत जगांतील सर्वश्रेष्ठ सौंदर्यें एकवटलीं आहेत. "

शिव-मुखांतून एकाम्र-काननाचा हा महिमा ऐकून उमा स्तिमित झाली. ती लगेच एकाम्र-काननाचें सुख लुटण्यासाठीं गौळणीच्या रूपानें तेथें गेली आणि गाईंचे कळप सांभाळून शिवोपासना करूं लागली. त्या वनांत कृत्ति आणि वास या नांवाचे दोन राक्षस राहत होते. त्या दुष्ट


दैत्यांनीं या रूपसुंदर गौळणीला पाहिलें आणि त्यांच्या मनांत तिच्याविषयीं अभिलाषा निर्माण झाली. त्या दैत्यांची ही अभिलाषा ध्यानांत येतांच ही महामाया त्यांना म्हणाली, " जर तुम्ही मला खांद्यावर घेऊन या वनाभोंवतीं फिरविण्याचें मान्य करीत असाल, तर मी तुम्हां दोघांचीहि पत्नी व्हायला सिद्ध आहें. "

दैत्यांना आनंद झाला. त्यांनीं गौळणीची ही अट मान्य केली. लगेच ती अद्भुत गौळण आपले दोन पाय दोघां दैत्यांच्या खांद्यांवर टाकून बसली आणि तिनें त्रिभुवनांचा भार आपल्या ठायीं एकवटल्यामुळें ते दोघे दैत्य तिच्या भारानें तत्काळ कोसळून गतप्राण झाले !

या घटनेनें उमा श्रांत झाली आणि ती तहानेनें व्याकुळली. तिची तृषा शांतविण्यासाठीं शिवानें बिंदुसागर नांवाचें सरोवर निर्माण केलें. त्यानंतर शिव-पार्वती एकाम्र-काननांत कायमचीं नांदूं लागलीं.

**बिंदुसागर :**

हें प्रशस्त जलतीर्थ प्रत्यक्ष शिवानें निर्माण केलें आहे, असें पुराणांत लिहिलें आहे. कृत्ति आणि वास या दोन दैत्यांचा नाश



बिंदु सरोवर

केल्यानंतर श्रांत झालेल्या 'गोपालिनी' उमेची तहान भागविण्यासाठीं शिवानें या जलतीर्थाची निर्मिति केली, ही कथा वर सांगितलीच आहे. हें जलतीर्थ निर्माण केल्यावर शिवानें पृथ्वीवरच्या सर्व देवतांना आणि तीर्थ-जळांना निमंत्रण दिलें कीं, आपण सर्वांनीं बिंदुसागराच्या पवित्रीकरणा-साठीं यावें. शिवाच्या आवाहनाला मान देऊन सर्व देवदेवता आणि गंगा, यमुना, शतद्रु, कृष्णा, कावेरी इत्यादि पुण्यसलिला सरिता एकाम्रकाननांत एकत्र झाल्या आणि त्यांनीं आपल्या जळराशींतील एकक बिंदु टाकून 'बिंदुसागर' परिपूर्ण केला. या पवित्रीकरण-समारंभाचें पौरोहित्य प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें केलें. या वेळीं बिंदुसागराच्या चार कांठांना वेगवेगळीं नांवें मिळालीं. उत्तर कांठाला गोदावरी, दक्षिण कांठाला त्रिपुरा, पूर्व कांठाला मणिकर्णिका आणि पश्चिम कांठाला विश्रामा. अनंत आणि वासुदेव या दोन देवतांची बिंदुसागराच्या पूर्वकांठावर क्षेत्रपाल म्हणून स्थापना करण्यांत आली.

या पवित्रीकरण-समारंभांत गोदावरी, कां कोण जाणे, परंतु अनुप-स्थित होती. तिनें असें कळविलें कीं, रजस्वला असल्यामुळें मी येऊं शकत नाहीं. परंतु तिनें कळविलेलें कारण खरें नव्हतें. खरें म्हणजे तिला न्यायला शिवाचा नंदी तिच्याकडे गेला, तेव्हां त्याच्या पाठीवर बसून जाणें गोदावरीला अप्रतिष्ठेचें वाटलें. तिच्या दृष्टीनें नंदीच्या पाठी-वरून जाणें हें आपल्या बाबतींत अपमानास्पद आहे. कारण कांहीं का असेना, शिवानें तिला अनुपस्थितीच्या कारणावरून शाप दिला कीं, " तूं कायमची अस्पृश्या मानली जाशील ! " या शापानें गोदावरी दुःखित झाली. तिला आपल्या अहंकाराचा पश्चात्ताप झाला आणि तिनें प्रदीर्घ काळ तप करून शंकराचा राग सौम्य केला. नंतर शिवानें तिला असा उःशाप दिला कीं, " जेव्हां गुरु सिंह राशीला येईल, त्या काळांतच केवळ तुझें जळ पवित्र मानलें जाईल – एरवीं नाहीं ! त्याच वेळीं तुझ्या जळाचा बिंदु बिंदुसागरांत स्वीकारला जाईल. "

हें भुवनेश्वरांतील प्रख्यात जलतीर्थ बाजारपेठेजवळ सडकेला लागून आहे. बिंदुसागरास 'गोसागर' असेंहि म्हणतात. या तीर्थाची लांबी १४०० फूट असून रुंदी ११०० फूट आहे. यात्रिकानें प्रथम बिंदुसागराचें स्नान करून नंतरच शिवदर्शनास जावयाचें असतें. बिंदुसागरावर श्राद्ध-तर्पणादि धर्मकृत्येंहि चालतात. ग्रहणें, संक्रांति इत्यादि पर्वकाळीं बिंदुसागरांतील स्नानाचा महिमा विशेष मानला जातो. वैशाख महिन्यांत येथें 'चंदनयात्रा' (जलविहार) नामक उत्सव होतो. पारंपरिक समजुतीप्रमाणें बिंदुसागराभोंवतीं एकूण सात हजार मंदिरें होतीं. त्यांपैकीं आतां शंभरएक अस्तित्वांत आहेत.

**मूलक्षेत्र भुवनेश्वर :**

भुवनेश्वराचा महिमा जगन्नाथपुरीहूनहि अधिक मानला जातो. पुरीच्या यात्रेला जाणाऱ्या यात्रिकांनीं पुरीला जाण्याआधीं भुवनेश्वराचें दर्शन घेतलें पाहिजे, असा संकेत आहे. उत्कल खंडांत या संकेता-विषयींची कथा अशी आहे कीं, माळव्याचा राजा इंद्रद्युम्न यानें प्रथम श्रीलिंगराज ची एकाम्रकाननांत मनोभावें उपासना केली आणि श्रीलिंग-राजाच्या कृपाप्रसादानेंच राजाला श्रीजगन्नाथाचें दर्शन होऊं शकलें. या घटनेंतून स्वाभाविकपणेंच असा संकेत रूढ झाला कीं, जगन्नाथाच्या दर्शना-साठीं आधीं लिंगराजाची कृपा संपादन केली पाहिजे. या संकेतामुळेंच श्रीलिंगराजाच्या भुवनेश्वर क्षेत्राला 'मूलक्षेत्र' किंवा 'आदिक्षेत्र' असें नांव प्राप्त झालें आहे. भुवनेश्वर हें शैव क्षेत्र, तर जगन्नाथपुरी हें वैष्णव क्षेत्र. जगन्नाथाचें दर्शन घेऊं इच्छिणाऱ्या यात्रिकानें आधीं लिंगराजाचें दर्शन घ्यावयास हवें, या संकेतांत हरि-हरैक्याचा भाव सूचित झालेला आहे. शैव आणि वैष्णव यांच्या संघर्षांत हा संकेत म्हणजे समन्वयाचा एक सुगम सेतु ठरला असल्यास आश्चर्य नाहीं.

बंगालचे महान् वैष्णव संत श्रीचैतन्यमहाप्रभु पुरीला जाण्याआधीं भुवनेश्वरला आले होते. या संकेताचें उल्लंघन करणाऱ्यांना दर्शनाचें पुण्यफळ मिळत नाहीं, असें पुराणांनीं सांगून ठेवलें आहे.

भुवनेश्वराची क्षेत्रमर्यादा सांगतांना पुराणकार लिहितात :

**खण्डाचलं समासाद्य यत्रास्ते कुण्डलेश्वरः।**
**आसाद्य बलहां देवीं बहिरङ्गेश्वरावधि ॥**
**पञ्चक्रोशपरिमितं नानातीर्थविभूषितम् ।**
**कोटिलिङ्गावृतं क्षेत्रं चक्राकारं शुभं पुनः ॥**

— पश्चिमेस खण्डागिरि, पूर्वेस टंकापाणी या खेड्यांत नांदणारा कुण्डलेश्वर, दक्षिणेस बलहादेवी आणि उत्तरेस धौली टेकडी आणि बहिरंगेश्वराचें मंदिर या चतु:सीमांनीं युक्त असलेल्या भुवनेश्वर क्षेत्राचा विस्तार पांच कोसांचा आहे.

**भुवनेश्वरचा यात्राक्रम :**


भुवनेश्वरचें स्थानमाहात्म्य गाणारे 'एकाम्र-पुराण' आणि 'स्वर्णाद्रि-महोदय' या नांवाचे दोन ग्रंथ आहेत. या ग्रंथांत भुवनेश्वरचा यात्राक्रमहि विस्तारानें सांगितला आहे. भुवनेश्वरची यात्रा धार्मिक हेतूनें करूं इच्छि-णाऱ्यानें येथें तीन दिवस आणि तीन रात्री राहावयास हवें, असा नियम आहे. यात्रिकानें प्रथम बिंदुसागरांत स्नान करून क्षेत्रपति अनंतवासु-देवाचें दर्शन घ्यावें. नंतर देवीपादहराचें दर्शन. नंतर भुवनेश्वर-मंदिराच्या सिंहद्वारांत येऊन नमस्कार करावयाचा. त्यानंतर गणेश, गोपालिनी देवी, कार्तिकेय, नंदी, चंडेश्वर, कल्पतरु आणि सावित्री या क्रमानें दर्शनें घेऊन शेवटीं लिंगराजाचें दर्शन घ्यावयाचें —

**नमस्ते भुवनेशाय नमस्ते कृत्तिवाससे।**
**त्वद्दर्शनफलं देहि मोक्षसाधनमीश्वर ॥**
**यत्कृतं च मया देव ह्यष्टमूर्त्यवलोकनम् ।**
**समस्तं तत् फलं भूयात् प्रसादात्तव शङ्कर ॥**
**कृत्तिवास नमस्तेस्तु लिङ्गराज महेश्वर ।**
**स्वर्णकूटपते शम्भो जय त्रिभुवनेश्वर ॥**

**श्रीलिंगराजाचें मंदिर :**

ज्याच्यामुळें या क्षेत्राला 'भुवनेश्वर' असें नांव पडलें, तें मंदिर म्हणजे त्रिभुवनेश्वर लिंगराजाचें होय. याची बांधणी अकराव्या

शतकांत झालेली आहे. या क्षेत्रांतील मंदिरांच्या संभारांत हें मंदिर मुख्य आहे. या मंदिराभोंवतीं उंच प्राकार ( ५२०'×४६५' ) आहे. प्राकाराला चारी दिशांस चार प्रवेशद्वारें आहेत. पूर्वेकडील मुख्य प्रवेश-द्वाराला 'सिंहद्वार' असें नांव आहे. सिंहद्वारांतून आंत प्रवेश करतांच प्रथम गणेश-मंदिर, त्या-नंतर नंदी-स्तंभ आणि त्यापुढें मुख्य मंदिराचा भोगमंडप लागतो. या मंडपांतच लिंगराजाला हरि-हरमंत्रानें भोग-समर्पण केलें जातें. भोगमंडपापुढें नटमंदिर ( जग-मोहन ), त्यापुढें मुखशाला आणि त्यापुढें श्रीमंदिर किंवा विमान आहे. १२७ फूट उंचीच्या या मंदिराच्या तीन भागांत तीन मंदिरें आहेत. दक्षिणभागीं गणेश असून त्या भागास 'निशा' असें म्हणं-तात. लिंगराजाच्या उत्तरभागीं कार्तिकेयाचें मंदिर आहे आणि पश्चाद्भागीं पार्वती-मंदिर आहे. पार्वतीची मूर्ति खंडित असूनाहि चेतोहर आहे. या अतर्गत तीन मंदिरांशिवाय लिंगराज-मंदिराच्या ऊर्ध्वभागांत कीर्तिमुख, नाट्येश्वर, दशदिक्पाल इत्यादींच्या मूर्ति आहेत.



लिंगराज-मंदिर

भव्यता, प्रमाणबद्धता आणि कलेची आकर्षकता यांचा त्रिवेणी संगम असलेलें हें मंदिर त्याच्या उत्तुंग शिखरामुळें केवळ प्राकारांतील मंदिर-समूहांतच नव्हे, तर साऱ्या परिसरांत उठून दिसतें.

लिंगराज-मंदिराच्या प्राकारांत मुख्य मंदिराशिवाय महाकालेश्वर, लक्ष्मी-नृसिंह, यमेश्वर, विश्वकर्मा, भुवनेश्वरी, गोपालिनी पार्वती, इत्यादि

देवदेवतांचीं मंदिरें आहेत. यांपैकीं भुवनेश्वरी ही त्रिभुवनेश्वर लिंगराजाची शक्ति मानली जाते. भुवनेश्वर-मंदिराजवळील नंदी-मंदिरांत नंदीची प्रचंड मूर्ति आहे.

**त्रिभुवनेश्वराचें दर्शन :**

या मंदिरांत 'स्वयंभू' शिवलिंग आहे. अर्थात् हें शिवलिंग घडवलेलें नाहीं. सुमारें आठ फूट परिघाची आणि जमिनीपासून सुमारें आंठ इंच उंचावलेली अशी प्रचंड शिळा म्हणजेच येथील 'स्वयंभू' लिंगराज. या प्रचंड शिवलिंगाभोंवतीं, उत्तरेकडे निमुळती होत गेलेली काळ्या पाषाणाची शाळुंका आहे. या शिवस्थानास लिंगराज, कृत्तिवासा, त्रिभुवनेश्वर अशीं नांवें आहेत. येथील लिंगाच्या प्रचंडतेमुळें 'लिंगराज' हें नांव पडलें असावें. 'कृत्तिवासा' हें शिवाचेंच एक नांव – 'कृत्तिवासा' म्हणजे गजचर्म परिधान करणारा. 'कुमार-संभवां'त कालिदासानें शिवाचें वर्णन करतांना 'कृत्तिवासा' हें नांव वापरलें आहे.

'त्रिभुवनेश्वर' या नांवाचें लघुरूप भुवनेश्वर. त्रिभुवनांचा ईश्वर शिव येथें नांदत आहे, म्हणून या क्षेत्रासहि, भुवनेश्वर अशी संज्ञा प्राप्त झाली.

हें लिंग म्हणजे शिळेंतून अंकुरलेला बुद्‌बुदाकार आहे, या कल्पनेनें यास 'बुद्‌बुद लिंग' असें म्हणतात. हें लिंग चक्राकार असल्यामुळें 'हरिहरात्मक लिंग' मानलें जातें. कांहीं जण हें त्रिभुजाकार आहे, असें मानून त्याला 'हरगौर्यात्मक लिंग' म्हणतात, तर कांहीं त्याच्या दीर्घतेमुळें त्यास 'कालरुद्रात्मक लिंग' मानतात. हें लिंग हरिहरात्मक असल्यामुळें येथील मुख्य आयुध त्रिशूल नसून पिनाक म्हणजे धनुष्य हेंच आहे. येथील वैशिष्ट्य असें आहे कीं, दर्शनेच्छु यात्रिक स्वत: आंत जाऊन पूजा करूं शकतो. त्रिभुवनेश्वराच्या भेटीसाठीं कुणा मध्यस्थाची जरूरी नाहीं – शुद्ध हृदयानें गर्भागारांत प्रवेश करावा आणि त्रिभुवनेश्वराच्या स्पर्शानें पुनीत व्हावें !

## नित्योपासना :

श्रीलिंगराजाची नित्योपासना श्रीजगन्नाथाच्या नित्योपासनेप्रमाणेंच चालू असते. नित्योपासनेंत एकूण २२ विधींचा समावेश होतो: ( १ ) पहाटे देवाला जागविण्यासाठीं घंटा वाजवितात आणि देव जागा झाल्यावर गर्भगृहाचें द्वार उघडलें जातें. ( २ ) नंतर काकडारती होते. ( ३ ) नंतर पाणी आणि दंतधावनकाष्ठ यांच्या सहाय्यानें देवाचें मुख-प्रक्षाळण करतात. ( ४ ) त्यानंतर पवित्र जळानें भरलेले अनेक कलश ओतून देवाला स्नान घालतात. ( ५ ) स्नानानंतर देवावर पोषाख चढविला जातो. ( ६ ) त्यानंतर मिठाई, दही, नारळ इत्यादि पदार्थांचा प्रथम उपाहार देवाला अर्पण केला जातो. या प्रथमोपाहाराला 'वल्लभ' अशी संज्ञा आहे. ( ७ ) त्यानंतर कांहीं वेळानें मुख्य उपाहार अर्पण केला जातो. यास 'सकल-धूप' असें म्हणतात. ( ८ ) देवाला एक 'आसन' अर्पण करतात. ( ९ ) नंतर देव भोजन करतो. ( १० ) मध्यान्हीच्या सुमारास कढी, भात, पोळ्या, लोणी इत्यादींनीं युक्त असा 'भोग' समर्पण करतात. याच वेळीं पुजारी देवाला पंचारती ओवाळतो. ( ११ ) या भोग-स्वीकारानंतर तिसऱ्या प्रहरीं ४ वाजेपर्यंत देव वामकुक्षी घेतो. या काळांत मंदिराचीं द्वारें बंद ठेवण्यांत येतात. ( १२ ) दुपारीं ४ वाजतां देवाला जागविण्यासाठीं वाद्य-गीतांचा प्रचंड घोष करतात. देव जागा झाल्यावर मिठाईचा नैवेद्य समर्पिला जातो. ( १३ ) त्यानंतर देवाचें दुसरें स्नान होतें. ( १४ ) स्नानानंतर सकाळच्यासारखाच वेष. ( १५ ) पुनः नैवेद्य-समर्पण. ( १६ ) त्यानंतर सायंस्नान. ( १७ ) या स्नानानंतर देवावर बहुमोल वस्त्रालंकार, सुगंधी द्रव्यें आणि पिवळीं फुलें चढवितात. ( १८ ) पुनः नैवेद्य-समर्पण. ( १९ ) त्यानंतर एक तासाच्या अंतरानें रात्रीचें भोजन. ( २० ) पांच मुखवटे आणि डमरु आंत आणून त्यांना नैवेद्य-समर्पण. ( २१ ) शेजारती. ( २२ ) शेजारतीनंतर देवाची शय्या गर्भगृहांत ठेवतात आणि मंदिराचीं द्वारें बंद करतात.

**वार्षिक महोत्सव :**

लिंगराजाच्या उपासनेंत वर्षभराच्या कालावधींत प्रतिवर्षी एकूण १४ प्रमुख उत्सव साजरे होतात. ते असे :

१. **प्रथमाष्टमी :** मार्गशीर्ष कृष्ण अष्टमी.

२. **प्रावरण** अथवा **ओरणी षष्ठी :** मार्गशीर्ष शुक्ल षष्ठी.

३. **पुष्याभिषेक :** पौष पूर्णिमा.

४. **मकरसंक्रांति :** माघ-संक्रांति.

५. **माघ-सप्तमी :** माघ शुक्ल सप्तमी ( रथसप्तमी ).

६. **शिवरात्रि :** फाल्गुन कृष्ण चतुर्दशी.

७. **अशोकाष्टमी :** चैत्र शुक्ल अष्टमी.

८. **दमनक-भंजिका :** चैत्र शुक्ल चतुर्दशी.

९. **अक्षय्यतृतीया :** वैशाख शुक्ल तृतीया. या दिवशीं 'चंदन-यात्रा' नामक उत्सव सुरू होतो. हा उत्सव २२ दिवस चालतो.

१०. **परशुरामाष्टमी :** आषाढ शुक्ल अष्टमी.

११. **सायण चतुर्दशी :** आषाढ शुक्ल चतुर्दशी.

१२. **पवित्रारोपण :** श्रावण पूर्णिमा.

१३. **यमद्वितीया :** कार्तिक शुक्ल द्वितीया.

१४. **उत्थान चतुर्दशी :** कार्तिक शुक्ल चतुर्दशी.

हे सर्वच उत्सव मोठ्या थाटामामानें साजरे होतात. या सर्व उत्सवांत अशोकाष्टमीचा उत्सव प्रमुख होय. या दिवशीं जगन्नाथाच्या रथयात्रेप्रमाणेंच येथेंहि रथ-यात्रा निघते. श्रीलिंगराजाची मूर्ति चल नसल्या-मुळें हे सर्व उत्सव चंद्रशेखर नामक उत्सव-मूर्तीसह साजरे होतात.

**भोग-समर्पण :**

देवाच्या उपासनेंतील भोग-समर्पणाचे दोन प्रकार आहेत : एक कोठा भोग आणि दुसरा छत्र भोग. पूजाव्यवस्थेच्या स्थिर निधींतून जे

भोग समर्पिले जातात, ते कोठा भोग आणि यात्रिकांच्या दानांतून जे भोग समर्पिले जातात, ते छत्र भोग. कोठा भोग हे नित्य असतात, तर छत्र-भोग हे यात्रिकांच्या दानावर अवलंबून असल्यामुळें नैमित्तिक-प्रासंगिक असतात. कोठा भोग देवाच्या सेवकांत वांटले जातात. छत्रभोगांचा विनियोग यात्रिकांच्या सूचनेनुसार होतो – तो गरीब-गुरिबांना वांटण्याची व्यवस्था केली जाते. मंदिरांतील सेवक महाप्रसादाची विक्री करतात. त्यांच्याकडून महाप्रसाद घेऊन तो भुकेल्यांना वांटणें हाहि एक छत्रभोगाचाच प्रकार आहे.

**महाप्रसाद :**

जगन्नाथाच्या महाप्रसादप्रमाणेंच लिंगराजाच्या महाप्रसादाचा महिमा आहे. येथेंहि शिजविलेला भातच 'महाप्रसाद' म्हणून वांटला जातो. सर्व जातींचे हिंदु शैव-वैष्णव हा भेद विसरून महाप्रसादाचा स्वीकार करतात. जगन्नाथाचा महाप्रसाद ज्याप्रमाणें ब्राह्मण आणि चांडाळ एकत्र भक्षण करूं शकतात, त्याचप्रमाणें लिंगराजाचा महाप्रसादहि जाति-भेदांना थारा न देतां स्वीकारला जातो. लिंगराजाच्या द्वारीं ब्राह्मण आणि चांडाळ दोघेहि समान आहेत.

श्रीलिंगराज हा केवळ शिव नाहीं – केवळ विष्णुहि नाहीं. त्याचें स्वरूप हरिहरात्मक आहे. 'चैतन्यमंगल', 'चैतन्यभागवत' यांसारख्या चैतन्यचरित्रांत चैतन्यांच्या भुवनेश्वर-यात्रेचीं विस्तृत वर्णनें आलीं आहेत. श्रीचैतन्यमहाप्रभु यांनीं पुरीला जाण्याआधीं भुवनेश्वरला येऊन श्रीलिंगराज आणि येथील अन्य शिवस्थानें यांचें दर्शन-पूजन करून मोठ्या भक्तिभावानें शिष्य-परिवारासह महाप्रसादाचें सेवन केलें होतें.

लिंगराज-मंदिराची व्यवस्था पूर्वीं पुरीच्या राजाकडे होती. हळू-हळू पुरीच्या राजांनीं आपलें लक्ष केवळ पुरीच्या जगन्नाथ-मंदिरावरच केंद्रित केलें आणि लिंगराज-मंदिराची व्यवस्था आपल्या प्रतिनिधींकडे सोपविली. पुढें ती व्यवस्था सरकारकडे गेली. सध्यां सरकारनियुक्त तीन सदस्यांच्या समितीकडे मंदिराचें व्यवस्थापन आहे.

मंदिराच्या सेवकवर्गांत ब्राह्मण आणि शूद्र असे दोन्ही प्रकारचे सेवक आहेत. शूद्र सेवकांना 'बरु' (मुख्य) असें बिरुद असून, देवाच्या पूजेसाठीं बेल-फुलें आणण्याचें काम त्यांच्याकडे असतें. ते देवाचे मूलसेवक होत, असें म्हणतात.

**पवित्र जलतीर्थें :**

भुवनेश्वरांत एकूण नऊ जलतीर्थें आहेत : १ बिंदुसरोवर, पापनाशिनीतीर्थ, ३ गंगा-यमुनातीर्थ, ४ कोटितीर्थ, ५ देवीपापहरातीर्थ, ६ मेघतीर्थ, ७ अलाबुतीर्थ, ८ अशोक कुंड ( रामह्रद ), व ९ ब्रह्मकुंड. या नऊ तीर्थांपैकीं बिंदुसरोवर व ब्रह्मकुंड यांचा महिमा विशेष मानला जातो. ब्रह्मकुंड हें तीर्थ बिंदुसरोवरापासून सुमारें दोन फर्लांग अंतरावर गांवाबाहेर असलेल्या ब्रह्मेश्वर-मंदिरानजिक आहे. या मंदिराच्या परिसरांत आणखीहि कांहीं मंदिरें आणि मेघकुंड, रामह्रद व अलाबुतीर्थकुंड हीं जलतीर्थें आहेत. या कुंडांजवळच मेघेश्वर, रामेश्वर व अलाबुकेश्वर हीं मंदिरें आहेत. कोटितीर्थ भुवनेश्वरांत येण्याच्या मुख्य मार्गाच्या कडेला आहे. देवीपापहरा हें तीर्थ लिंगराज-मंदिराच्यासमोर कार्यालयाच्या प्रांगणांत असून, पापनाशिनीतीर्थ या मंदिराच्या मागें असलेल्या यमेश्वर-मंदिराच्या समोर आहे.

**राजा-राणी-मंदिर :**

मुख्य मंदिराच्या ईशान्येस राजाराणी, मुक्तेश्वर आणि परशुरामेश्वर हीं तीन उत्कृष्ट मंदिरें आहेत. या मंदिरांत सध्यां मूर्ति नाहीं. परंतु तें शैव परंपरेंतील मंदिर आहे, हें निश्चित. द्वारावरील चंड-प्रचंड हे द्वारपाल आणि नटराज, लिंगपूजा, निशापार्वती, शिवपार्वती-विवाह इत्यादि भिंतींवरील मूर्तिशिल्पें पाहतां हें शिवाचें मंदिर आहे, यांत कांहीं शंका राहत नाहीं. ज्या वालुकामय पिवळसर दगडाचा उपयोग या मंदिरासाठीं केला आहे, त्याला स्थानिक लोक 'राजाराणिया' असें म्हणतात — त्यामुळें या मंदिराला राजाराणी-मंदिर असें नांव पडलें आहे.


या मंदिराची शिल्पभूषा अत्यंत रेखीव असून, येथील शिल्पांतील सौंदर्य आणि कोंवळीक मन हलवून सोडणारी आहे. या मंदिरावरील मूर्तिशिल्पेंहि शृंगारिक आहेत, परंतु तीं जगन्नाथ-मंदिरावरील लैंगिक मूर्ति-शिल्पांइतकीं बीभत्स नाहींत. या मूर्ति सहज जातां-येतां दिसण्या-सारख्या जागीं नसल्यामुळें, तसेंच ऊन-वारा-पाऊस यांपासून सुरक्षित राहिल्यामुळें त्यांतील नव्हाळी आणि टवटवीत सौंदर्य आजहि ओथंबून आल्यासारखें वाटतें. या मंदिराच्या शिल्पसौंदर्याविषयीं एका पूर्वभारतीय रसिकानें म्हटलें आहे कीं, "राजाराणी-मंदिरांतील मूर्तिशिल्पांच्या निर्मितींत ओरिसाची चित्रशिल्पकला प्रकर्षाला पोंचली आहे. येथील मूर्तिशिल्पें आणि अन्य शिल्पकलांश म्हणजे निःसंशय कलेचीं कमनीय लेणीं आहेत. परंतु त्यांत कांहीं दोषाहि राहून गेले आहेत. येथील मंदिर-भूषेसाठीं ज्या आलसकन्या जागोजाग कोरलेल्या आहेत, त्यांचे नितंबभाग कांहींसे अवास्तव बनलेले असल्यामुळें त्यांच्या रेखीव नितळ सौंदर्यांत उणीव निर्माण झाली आहे."

**मुक्तेश्वर-मंदिर :**

ओरिसांतील उत्कृष्ट मंदिरांपैकीं एक असलेलें हें मंदिर केदार-गौरी-मंदिराजवळच आहे. भव्य आणि सुंदर तोरणांतून या मंदिराजवळ जातांच प्रेक्षकाचें मन मोहून जातें. ज्या मंदिरसमूहांत हें मंदिर उभें आहे, तेथील मंदिरांपेक्षां हें खूपच लहान असूनाहि शिल्पसौंदर्याच्या दृष्टीनें तें तिळभरहि उणें नाहीं. या लहानशा मंदिराचा मुखमंडप (Porch) भारतीय मंदिर-शिल्पांत सर्वोत्कृष्ट मानला जातो. या शिव-मंदिराच्या अंतर्भागांत उंदीर आणि मोर हीं गणेश व कार्तिकेय यांचीं वाहनें असून हातांत लहान बालकें घेतलेल्या सप्तमातृकांचा मूर्तिपट आहे. या मंदिराच्या बांधणींत व शिल्पसौंदर्यांत भव्यतेऐवजीं मार्दवच अधिक आहे. नर्तन-वादनशील सुंदरी, शिष्यांना उपदेश करणारा ऋषि, पोथी वाचीत बसलेला पंडित, छत्रधारिणी युवती, हातांत पोपट खेळवीत

दारांत उभी राहिलेली स्त्री, इत्यादि मूर्तिशिल्पांनीं या मंदिराची अंतर्बाह्य प्रेक्षणीयता वाढविली आहे.

मुक्तेश्वर-मंदिर हें भुवनेश्वरांतील मंदिरसमूहांत सर्वांत लहान असूनहि अत्यंत सुंदर आहे. या मंदिराचें गर्भगृह आंतून केवळ साडेसात फूट लांबी-रुंदीचें असून मंदिराची उंची फक्त पस्तीस फूट आहे. परंतु मंदिराची रचना इतकी प्रमाणबद्ध आणि परिणामकारी आहे कीं, प्रेक्षकाची दृष्टि त्यावर खिळून राहते. कलावंतानें या मंदिराची भूषा वडवितांनाहि प्रमाणबद्धतेचें भान ठेवलें आहे. मंदिराच्या लहानशा आकाराला साजेशीच कलाकुसर येथें आढळते. कलाकुसरींतील लहानसहान बारकावेहि अत्यंत नाजूक हातानें खोदलेले आहेत. त्याचमुळें या मंदिराच्या शिलांतून कलेची कोवळीक उमलून आली आहे असें वाटतें. नागर शिल्पशैलीच्या कलिंग संप्रदायाचा हा एक उत्कृष्ट नमुना समजला जातो. अनेक शिल्परसिकांनीं या मंदिराच्या कला-सौंदर्याविषयीं धन्योद्‌गार काढलेले आहेत. श्री. फर्ग्युसन यांच्या मतें हें मंदिर म्हणजे 'उत्कल शिल्पमालेंतील कौस्तुभ' आहे, तर श्री. राजेन्द्रलाल मित्र यांच्या मतें तें 'उत्कल शिल्पाच्या सौंदर्याचें उत्तुंग शिखर' आहे. कराल कालाचे क्रूर हात अजूनहि त्याचें सौंदर्य पुसूं शकले नाहींत.


मुक्तेश्वर-मंदिर

**परशुरामेश्वर-मंदिर :**

हें मंदिर मुक्तेश्वराच्या पश्चिमेस सुमारें २०० यार्ड अंतरावर आहे. भुवनेश्वराच्या मंदिर-समूहांत हें सर्वांत प्राचीन मंदिर असावें, असा कांहीं तज्ज्ञांचा तर्क आहे. या मंदिरांतील मूर्तिशिल्पांत महायान-पंथीयांचा प्रभाव मुळींच आढळत नाहीं. याच्या भिंतीवर रामायणांतील अनेक प्रसंग बारकाईनें कोरलेले असून, शिव-पार्वती, किरातार्जुन इत्यादि अन्य मूर्तिशिल्पेंहि सुंदर आहेत. ओरिसाच्या शिल्पपरंपरेचा हा प्राचीन नमुना निःसंशय प्रेक्षणीय आहे.

**अनंतवासुदेव-मंदिर :**

हें मंदिर बिंदुसरोवराच्या पूर्वतीरावर आहे. अनंतवासुदेव ही एकाम्र काननाची अधिष्ठात्री देवता समजली जाते. याच्या अनुमतीनेंच



अनंतवासुदेव-मंदिर

शिव ( लिंगराज ) येथें रहावयास आला, अशी कथा आहे. या मंदिरांत नारायण, सुभद्रा आणि लक्ष्मी यांच्या मूर्ति आहेत. या भव्य मंदिरांत बाराव्या शतकांतील एक शिलालेख आहे. या शिलालेखांत अशी नोंद आहे कीं, " भवदेव भट्ट नामक वंगीय ब्राह्मण मंत्र्यानें या मंदिराचा जीर्णोद्धार केला, नव्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा केली आणि बिंदुसरोवराचें पुनरुत्खनन केलें. "

**केदार-गौरीच्या प्रेमाची स्मृति :**

केदार-गौरी-मंदिर म्हणजे एका प्रेमी युगुलाच्या अमर प्रीतीचें शिला-स्मारक आहे. उत्कलमधील गौरी नामक एका राजकन्येच्या उद्ध्वस्त प्रेम-जीवनाची करुण कहाणी या मंदिराच्या निर्मितीमागें आहे. गौरीचें केदार नामक एका युवकावर प्रेम होतें. हा केदार सुदृढ होता, बुद्धिमान् होता, धैर्यवान् होता आणि देखणाहि होता. परंतु तो कांहीं राजपुत्र नव्हता — तो एका सामान्य दरिद्री घराण्यांतील होता. राजाला आपल्या कन्येनें एका दरिद्री तरुणावर प्रेम करावें, हें रुचलें नाहीं. तो मनोमन संतापला आणि त्यानें केदारालाच नष्ट करण्याचें कारस्थान रचलें. केदारला होता शिकारीचा नाद. राजाला हें माहीत होतें. राजानें त्याची शिकारीची वेळ लक्षांत घेऊन आपल्या शिकारखान्यांतील एक सिंह घेऊन एका नोकराला अरण्यांत पाठविलें. राजाच्या आदेशाप्रमाणें तो नोकर सिंहाला घेऊन केदाराच्या वाटेवर एका जाळींत लपून बसला.

त्या वाटेवरून केदार जाऊं लागतांच राजाच्या नोकरानें सिंहाला भडकवून त्याच्या अंगावर सोडलें. केदार प्रथम गांगरला, परंतु नंतर लगेच सावध होऊन त्यानें सिंहाशीं सामना सुरू केला. बराच वेळ त्या दोघांची झटापट झाल्यावर केदार रक्तबंबाळ होऊन जमिनीवर कोसळला.

हें दृश्य पहात राजाचा नोकर जाळींत बसलाच होता. त्याने केदार पडलेला पाहतांच सिंहाला आवरून घेतला आणि तो परत

आला. राजकन्येला ही वार्ता समजतांच ती भग्नहृदय झाली. आणि धांवतच अरण्यांत गेली. अपघाताच्या जागीं पोंचतांच तिला जें दृश्य दिसलें, तें पाहून तिची खात्री झाली कीं, सिंहानें केदाराला खाऊन टाकलें! तेथें केवळ त्याचे कपडे फाटलेल्या स्थितींत रक्ताच्या थारोळ्यांत पडलेले होते. गौरीला केदारावांचून जीवन शून्य वाटलें आणि त्याच जागीं तिनें गळफांस लावून आत्महत्या केली.

गौरी या जगांतून नाहींशी झाली, परंतु केदार जिवंत होता. अरण्यांत राहणाऱ्या लोकांनीं त्याला जखमी अवस्थेंत उचलून नेलें होतें आणि रानचे उपचार करून त्यांनीं त्याला वांचवलें होतें. बरा होतांच तो धांवतच गौरीच्या भेटीसाठीं राजधानींत आला, परंतु गौरी कुठें होती? गौरीनें आपल्या वियोगाच्या कल्पनेनें आत्महत्या केली, हें समजतांच त्या प्रेमिकाला जीवन असह्य झालें आणि तो त्याच क्षणीं हृदयक्रिया बंद पडून मरण पावला.



प्रणयी युगुल : लिंगराज-मंदिर

त्या दोन प्रेमिकांचा असा करुण अंत होतांच राजाहि दुःखित झाला. त्याला आपल्या क्रूरकर्माचा पश्चात्ताप झाला. पश्चात्तापानें होरपळून



दा. क्र. १२९८८

गेला असतांना त्याला एकदां एक स्वप्न पडलें. स्वप्नांत त्याच्याजवळ एक देवता आली आणि तिनें राजाला सांगितलें कीं, " हे क्रूरकर्म्या, तूं दोन निष्पाप प्रेमिकांची भीषण हत्या केली आहेस. त्या पापाचें प्रायश्चित्त म्हणून तूं एक शिवमंदिर बांध. "

— त्या प्रेमिकांच्या स्मृतीसाठीं राजानें उभारलेलें शिव-मंदिर म्हणजेच हें केदार-गौरी-मंदिर होय.

## भुवनेश्वरचा परिसर :

भुवनेश्वरचा परिसर अनेक प्राचीन ऐतिहासिक स्मृतींनीं रंगलेला आहे. विशेषत: बौद्ध धर्माचे अनेक अवशेष भुवनेश्वरच्या परिसरांत आहेत. या सर्व ऐतिहासिक अवशेषांच्या निरीक्षण-संशोधनासाठीं अनेक ज्ञान-यात्रिक येथें येत असतात. ऐतिहासिक दृष्ट्या धौली आणि खंडागिरि या टेकड्या विशेष प्रसिद्ध आहेत.

**धौली :** भुवनेश्वरच्या नैर्ऋत्येस सुमारें सहा मैल अंतरावर 'धौली' या नांवाचें एक खेडें आहे. हें खेडें 'दया' नामक एका छोट्या नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर वसलेलें आहे. परंपरेनें असें मानलें जातें कीं, या नदीचें 'दया' हें नांव 'दधिभद्रा' या नांवाचा अपभ्रंश असून, याच नदीच्या कांठीं महर्षि दधीचींनीं देवांच्या विजयासाठीं आपल्या अस्थि इंद्राला दिल्या. कांहीं संशोधकांचें असें मत आहे कीं, कलिंगांतील राजप्रतिनिधि म्हणून अशोक ज्या 'तोसली' गांवीं राहत असे, तें गांवहि हेंच होय. येथें अशोकाचीं कांहीं शिलाशासनें आणि गौतम बुद्धाचें प्रतीक असलेला हत्ती आहे. हा हत्ती सध्यां गणेश-देवतेच्या स्वरूपांत बहुजनांना आदरणीय झालेला आहे. येथील शिलालेख तीन स्तंभांत विभागलेला आहे. डावीकडील पहिल्या स्तंभांत एकूण २६ ओळींत अशोकाच्या विशेष शासनांपैकीं पहिलें शासन कोरलेलें आहे. मधल्या स्तंभांत एकूण ३६ ओळी असून त्यांत अशोकाच्या साधारण शासनांपैकीं १ ते ५ हीं शासनें समाविष्ट आहेत. उजवीकडील स्तंभांतील १९ ओळींत दुसरें साधारण शासन आहे.

अशोकाचा हा शिलालेख त्याच्या राज्याभिषेकानंतर बाराव्या वर्षीं म्हणजे ख्रिस्तपूर्व २५७ मध्यें खोदलेला आहे. अर्थातच कलिंग-युद्धानंतर चार वर्षांनीं खोदलेला हा लेख आहे. या लेखाच्या पहिल्या शासनपत्रांत अशोकानें आपल्या न्यायाधिकाऱ्यांना असा आदेश दिला आहे कीं, प्रजेपैकीं कुणालाहि योग्य चौकशीशिवाय शासन करतां कामा नये. दुसऱ्या शासनांत त्यानें अरण्यवासी प्रजेला सुरक्षिततेचें आश्वासन दिलें असून, आपण प्रजेला पितृवत् आहोंत, असें म्हटलें आहे.

**खण्डागिरि :** धौलीपेक्षां खण्डागिरि विशेष प्रसिद्ध आहे. येथें यात्रिकांची ये-जा फार असते. या यात्रिकांत धर्मयात्रिकांप्रमाणेंच ज्ञान-यात्रिकांचाहि भरणा असतो. धौली हें स्थान केवळ अशोकाच्या इतिहासाच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे, तर खण्डागिरि येथें जैन आणि बौद्ध या उभय धर्मांच्या इतिहासाचीं केंद्रें आहेत.

खण्डागिरि हें स्थान भुवनेश्वरच्या वायव्य दिशेस तीन मैल अंतरावर आहे. खण्डागिरीला एकूण तीन शिखरें आहेत : उदयगिरि, खण्डागिरि आणि नीलगिरि. या तीनहि टेकड्यांत लेणीं खोदलेलीं आहेत. हीं लेणीं भारतांतील प्राचीनतम लेणीं असून, महाराष्ट्रांतील सह्याद्रींतील लेण्यांबाहेरचीं हीं एवढींच अन्य प्राचीन लेणीं आहेत. येथें एकूण ६६ लेणीं असून, त्यांपैकीं उदयगिरीवर ४४, खण्डागिरीवर १९ आणि नीलगिरीवर ३ आहेत.

कलिंग-सम्राट् खारवेलाच्या शिलालेखांत उदयगिरीचा उल्लेख 'कुमारीपर्वत' या नांवानें आला असून पतंजलीच्या महाभाष्यांत खण्डागिरीला 'खण्डिका' म्हटलें आहे. या टेकड्यांतील लेण्यांना जय-विजय-गुंफा, पनसगुंफा, स्वर्गपुरी, मंचपुरी, हाथीगुंफा, गणेशगुंफा, राणीगुंफा, अनंतगुंफा, नवमुनिगुंफा, ललतेन्दु केसरी गुंफा, इत्यादि नांवें आहेत. यांपैकीं कांहीं गुंफा इसवी सनापूर्वींच्या, खारवेलाच्या काळांतील आहेत; या गुंफांत कांहीं त्रुटित लेख उपलब्ध आहेत. अशोक आणि तदुत्तर

मगध सम्राटांच्या आक्रमणाविरुद्ध कलिंगानें केलेली यशस्वी प्रतिक्रिया खारवेलाच्या हाथीगुंफा लेखांत प्रकटली आहे.

राणीनहर गुंफेंत सुंदर कोरीव काम आहे. या गुंफेंत तीर्थंकराच्या मिरवणुकीचें एक दृश्य आहे. जय-विजय गुंफेंत दोन खोल्या आणि पुढें व्हरांडा आहे. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस पुरुष द्वारपाल असून उजवीकडे स्त्री द्वारपाल आहे. आंत दोन पुरुष आणि दोन स्त्रिया पवित्र वृक्षाचें पूजन करीत असून एक यक्ष ( समर्पणद्रव्यें घेतलेला ) उभा आहे, असें दृश्य आहे. मंचपुरी गुंफेंतील शिलालेखांत असा उल्लेख आहे कीं, ही गुंफा कलिंगाचा राजा बकदेव महामेघवाहन यानें बांधली. स्वर्गपुरी गुंफेंत एक तीन ओळींचा शिलालेख आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, ही गुंफा खारवेलाच्या पट्टराणीनें साधूंच्या निवासासाठीं बांधली आहे. नवमुनिगुंफेंत उद्योतकेसरीच्या राज्यकाळांतील ( १० वें शतक ) एक लेख असून, त्यांत शुभचंद्र नामक जैन मुनीचा उल्लेख आहे.

या सर्व गुंफांतील शिल्प आणि लेख यांचें निरीक्षण करतां असें आढळून आलें आहे कीं, ख्रिस्तपूर्व २०० पासून ख्रिस्तोत्तर १००० पर्यंतच्या काळांतील कलिंगाच्या इतिहासांतील अनेक स्मृति या टेकड्यांत संचित आहेत.

**शिशुपालगड :** हें स्थान भुवनेश्वरापासून सुमारें एक मैलावर आणि धौलीपासून तीन-चार मैल अंतरावर आहे. अनेक प्राचीन अवशेषांनीं गजबजलेलें हें स्थान पुरातत्त्वाच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. तीन मैल परिघाचें, भोंवतीं चौरस कोट असलेलें आणि मजबूत बांधणीचें हें उद्ध्वस्त नगर म्हणजे अशोकाच्या काळांतील प्रख्यात तोसली नगर होय, असें कांहीं विद्वानांचें मत आहे. कलिंगाचा प्रशासक म्हणून अशोक याच ठिकाणीं रहात होता. कोटाच्या भिंतीचे प्रचंड अवशेष, दोन उद्ध्वस्त द्वारें, इमारतींचे चौथरे, टेहळणी बुरूज, प्राचीन भांड्यांचे तुकडे इत्यादि उत्खननांत दिसून आलेल्या अवशेषांवरून इसवी सनापूर्वी तीसऱ्य-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... वि:..........
क्रमांक .................... नों दि: ..........

चाथ्यौ शतकांत हें नगर भराभराटलेलें होतें, असें सिद्ध झालें आहे. शिशुपालगडाच्या पश्चिमोत्तर बाजूस गंधवती या नांवाचा प्रवाह वाहत आहे. त्याला सध्यां गंगुआ असें नांव आहे.

## शिल्पकलेचें शिवपूजन

भुवनेश्वरचें वैभव हें असें आहे. येथें उत्कलभूमीचा पुरुषार्थ शिवचरणीं विनीत झाला आहे आणि त्यानें आपल्या वैभवाला आणि सामर्थ्याला शोभणाऱ्या शिल्पपुष्पांनीं शिवपूजन साजरें केलें आहे. आजवर भारतीय समाज-जीवनाचीं सर्व अंगोपांगें धर्माच्याच आश्रयानें विकास पावत आलीं. भारतीय कलाहि धर्मपरायणच आहेत. सर्व भारतीय शिल्पवैभव मूर्ति आणि मंदिरें यांच्या रचनेंत प्रकटलें आहे. भारतीय शिल्पकलेचा हा धर्माश्रित आविष्कार भुवनेश्वरच्या भूमींत पूर्णांशानें झाला आहे. येथें कलावंतांनीं आपल्या हृदयांतील विराट् सौंदर्यसाक्षात्काराला साक्षी ठेवून शिलांतून चित्कला फुलविल्या आहेत आणि त्यांच्या समर्पणानें शिवपूजनाचा दिव्य सोहळा साजरा केला आहे. भुवनेश्वरला जाणारा एखादा यात्रिक हा प्रारंभीं जरी अश्रद्ध असला, तरी येथून परततांना एका आगळ्या श्रद्धेनें त्याच्या हृदयाचा कणन् कण उजळला जातो—त्या अज्ञात कलावंतांच्या शिवसाधनेनें त्याच्या अंतरांतील अव्यक्त 'शिव' प्रकट होतो !



# यात्रिकांसाठीं अधिक माहिती

**स्थान :** ओरिसांतील पुरी जिल्हा, खुर्दा उपविभाग. ( २०°—१५′ उ. आणि ८५° ५०′ पू. ).

**लोकसंख्या :** सुमारें २०,०००.

**क्षेत्रफळ :** सुमारें ५ चौरस मैल.

**हवामान :** सम.

**भाषा :** उडिया, हिंदी व इंग्रजी.

**जाण्याचे मार्ग :** ( १ ) **मुंबईहून रेल्वेनें :** १२१४ मैल. **मोटारनें :** ११९४ मैल — मुंबई — नाशिक — धुळें — भुसावळ — नागपूर — रायपूर — संबळपूर — अंगुल — कटक — भुवनेश्वर. **कलकत्त्याहून रेल्वेनें :** २७२ मैल. हावडा-वॉल्टेअर मार्गावर कटक आणि खुर्दा रोड यांच्या-मध्यें कटकपासून १८ मैल अंतरावरचें स्टेशन. ( २ ) **मोटारनें :** ५३४ मैल — कलकत्ता — बरद्वान — आसनसोल — धनबाद — पुरुलिया — जमशेदपूर — चाइबासा — जाजपूर रोड ... जेनापूर — चौदवारी — भुवनेश्वर.

**अंतर्गत वाहनें :** भुवनेश्वर स्टेशनपासून क्षेत्र दोन-अडीच मैल. गांवांत जायला स्टेशनपासून बस, टांगे, रिक्षा, बैलगाड्या इत्यादि वाहनांची व्यवस्था आहे.

**राहण्याची व्यवस्था :** ( १ ) अन्य तीर्थक्षेत्रांतल्या व्यवस्थे-प्रमाणें येथेंहि तीर्थोपाध्यायांकडे राहण्याची व्यवस्था होते. ( २ ) श्रीहर-गोविंदरायजी मथुरादास डालमिया भिवानीवाले धर्मशाळा ( बिंदुसरोवरा-जवळ ). ( ३ ) रायबहादुर श्रीहजारीमलजी दूधवाले धर्मशाळा ( बिंदु-सरोवराजवळ ). ( ४ ) श्रीहरलालजी विश्वेश्वरलाल गोयनका धर्मशाळा ( बिंदुसरोवराजवळ ). ( ५ ) स्टेशनजवळील धर्मशाळा.

**नजिकचीं प्रेक्षणीय स्थळें :** ( १ ) धवलगिरि ( धौली ) — नैर्ऋत्येस ६ मैलांवर. ( २ ) खण्डागिरि-उदयगिरि — वायव्येस ३ मैलांवर. ( ३ ) शिशुपालगड — धौलीपासून तीन-चार मैलांवर आणि भुवनेश्वरपासून १ मैलावर. ( ४ ) कोणार्क — १७-१८ मैलांवर.

## भुवनेश्वरक्षेत्राचा पुराणोक्त माहात्म्य

तथा चैवोत्कलदेशे कृत्तिवासा महेश्वरः ।
सर्वपापहरं तस्य क्षेत्रं परमदुर्लभम् ॥

★

लिङ्गकोटिसमायुक्तं वाराणस्याः समं शुभम् ।
एकाम्रकेति विख्यातं तीर्थाष्टकसमन्वितम् ॥

★

एकाम्रके शिवक्षेत्रे वाराणसीसमे शुभे ।
स्नानं करोति यस्तत्र मोक्षं स लभते शुभम् ॥

★

यस्मिंस्तस्मिंस्तिथौ विप्राः स्नात्वा बिन्दुसरोम्भसि ।
पश्येद्देवं विरूपाक्षं देवीं च वरदां शिवाम् ॥

★

यस्तत्र तीर्थे विधिवत् करोति नियतेन्द्रियः ।
कुलैकविंशमुद्धृत्य शिवलोकं स गच्छति ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
१२१९८
८।८।६९
२९२

# सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-माला : पांच संच

**संच १ ला : रु. ३-६०** — सहा पु. : प्र. ६० न. पै.

१. सुंदर तें ध्यान : पंढरपूरचा पांडुरंग
२. जय जय रघुवीर समर्थ : समर्थांचा सज्जनगड
३. ज्ञानोबा माउली : ज्ञानदेवाची आळंदी
४. एका जनार्दनी : एकनाथांचें पैठण
५. मल्हारी मार्तंड : जेजुरीचा खंडोबा
६. तुका झालासे कळस : तुकारामांचें देहू

**संच२रा : रु. ३-७२** — सहा पु. : प्र. ६२ न. पै.

१, श्रीगोदे भवताप हरी ! : त्र्यंबकेश्वर; नाशिक
२. मंगलमूर्ति मोरया : मोरया गोसाव्यांचें चिंचवड
३. जय जगदंब : कोल्हापूरची अंबाबाई
४. श्रीगुरुदेव दत्त : नरसोबाची वाडी; औदुंबर
५. जय भवानी ! : तुळजापूरजी भवानी
६. माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिकें : नेवासें

**संच ३ रा : रु. ३-७२** — सहा पु. : ६२ न. पै.

१. गोमंतकाची शांतिशक्ति : शांतादुर्गा (कवळें)
२. पार्वतीपते ! हर हर महादेव : श्रीमंगेश
३. ‘ डाकिन्याम् भीमशंकरम् ’ : भीमाशंकर
४. दलितांचा कैवारी भार्गवराम : परशुराम
५. छत्रपतींचें कुलदैवत : शिखर शिंगणापूर
६. श्रीगुरूंचें गंधर्वपूर : गाणगापूर

**संच ४ था : रु. ५-२०** — आठ पुस्तकें : प्र. ६५ न. पै.

१. मंदिरमाला मुक्तागिरी : मुक्तागिरी
२. इथे टेकले श्रीराम : रामटेक
३. ‘ उदयोऽस्तु अम्बे ! ’ : अमरावती
४. विदर्भ-पंढरी : कौंडण्यपूर
५. अगस्त्यांचें संस्कृति-केंद्र : सालबर्डी
६. चन्द्रपूरची महाकाली : चन्द्रपूर
७. शेगांव-संतस्थान : शेगांव
८. स्वयंभू चिंतामणी : कळंब

**संच ५ वा : रु. ४-००** — सहा पुस्तकें : प्र. ६५ न. पै.

१. मातापूरची जगन्माता : माहूर
२. बारावें ज्योतिर्लिंग : वेरूळ
३. योगेश्वरीचें माहेर : आम्बेजोगाई ( ७५न.पै. )
४. ‘ परल्यां वैद्यनाथं ’ च : परळी वैजनाथ
५. ‘ नागेशं दारुकावने ’ : औंढ्या नागनाथ
६. दक्षिणद्वार देवगिरी : दौलताबाद